मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाद्वारे प्रतिदिन १२ मेगावॅट वीजनिर्मिती!

## महापालिकेच्या खर्चातही बचत करणारा हा प्रकल्प: आयुक्त



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महानगरपालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापना साठी (चौहळ) प्रतिदिन ७०० टन क्षमतेच्या प्रकल्पामधून १२ मेगावॅट वीजनिर्मिती होत असून येत्या काही दिवसांत हा प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. त्यातून १४ मेगावॅट वीजनिर्मिती केली जाईल, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे तसेच पर्यावरणविषयक समस्यांचे निराकरण करणे हा उद्देश या प्रकल्पाच्या माध्यमातून साध्य होत असून महापालिकेच्या खर्चातही बचत करणारा हा प्रकल्प ठरत आहे, असेही आयुक्त सिंह म्हणाले. पिंपरी-चिंचवड शहरात निर्माण होणाऱ्या दैनंदिन सुमारे १ हजार १५० मेट्रिक(चौहळ) टन कचऱ्यावर मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये प्रक्रिया केली जाते. त्यातील ७०० मेट्रिक टन कचऱ्यापासून १४ मेगावॅट वीजनिर्मिती करणे हे वेस्ट टू एनर्जी म्हणजेच कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प डीबीओटी तत्वावर पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप नुसार विकसित केला गेला असून त्यांच्यामार्फत २१ वर्षे कालावधीसाठी चालवला जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विनियम २०१६ चे पालन करून या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली असून कार्बन उत्सर्जनावर लक्ष ठेवण्यासाठी कार्बन उत्सर्जन निरिक्षण कार्यप्रणालीचा यामध्ये वापर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी सुमारे ७ लाख टन कार्बन उत्सर्जन रोखले जाणार आहे. कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प चालविण्यासाठी सुमारे २ मेगावॅट वीज लागत असून उर्वरित वीज ओपन ॲक्सेस पद्धतीने महापालिकेच्या वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट आणि मैलाशुद्धीकरण केंद्रांसाठी वापरण्यात येत आहे. हा प्रकल्प शहरामध्ये गोळा होणाऱ्या कचऱ्याच्या गुणधर्मांचा विचार करून तयार करण्यात आला असून त्यामध्ये कचऱ्याचे पुर्ण क्षमतेने ज्वलन व्हावे यासाठी मुव्हींग ग्रेटचा वापर करण्यात आलेला आहे. कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पाबाबत बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, या प्रकल्पाच्या आधारे केवळ कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जात नाही. तर, यामुळे महापालिकेच्या वीज बिलामध्येही भरीव बचत होत आहे.

### पालिकेच्या वीज बिलातही बचत

» कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पासाठी चिखली येथील मैलाशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया केलेल्या ५ एम.एल.डी पाण्याचा वापर करण्यात येत असल्याने पिण्याच्या पाण्याची बचतही होत आहे. महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित झाला असून यामुळे कचरा डंपिंगसाठी अधिकच्या जागेची गरज भासत नाही. पालिकेच्या वीज बिलातही बचत होत आहे. ग्रीड सिंक्रोनायझेशनसह वीजनिर्मिती प्रकल्पाच्या सहाय्याने १७ ऑक्टोबरपर्यंत एकूण २२.८८ लाख युनिट वीज निर्मिती केली गेली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने ६ ऑक्टोबर रोजी प्लांट कमिशनिंग प्रमाणपत्रही या प्रकल्पाला जारी केले आहे.

# अमृत कलश यात्रेचे पिंपरी चिंचवड पालिकेच्यावतीने स्वागत!

## अमृत कलश यात्रा पुण्याहून मुंबईकडे



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत मेरी माटी मेरा देश अर्थात माझी माती माझा देश अभियानामध्ये संकलित केलेल्या मातीचा अमृत कलश घेऊन पुण्याहून मुंबईकडे निघालेल्या अमृत कलश यात्रेचे स्वागत आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तथा शेखर सिंह यांनी केले. महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनासमोर झालेल्या या सोहळ्यास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, उपआयुक्त रविकिरण घोडके, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यालय अधिक्षक रवी भाट, माजी नगरसेवक माऊली थोरात, सामाजिक कार्यकर्ते प्रा. बी.बी. शिंदे यांच्यासह रथा समवेत असलेले पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणचे समन्वयक उपस्थित होते. हा अमृत कलश मुंबई येथून दिल्लीकडे नेण्यात येणार आहे. देशाचे प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी साहेबांच्या उपस्थितीत दिल्ली येथे दिमाखदार समारंभ पार पडणार आहे.

पुणे जिल्ह्यातील विविध शहरांचे प्रतिनिधी अमृत कलश घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना झाले. महापालिकेच्या वतीने कर्मचारी शिवाजी टिळे आणि मोहित भोसले प्रतिनिधित्व करीत असून ते या रथामध्ये सहभागी झाले आहेत. पुणे जिल्हा परिषद व नगरपालिका प्रशासन, पुणे यांनी अमृत कलश यात्रेच्या समन्वयाची जबाबदारी पार पाडली आहे. आज सकाळी पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथून जिल्ह्यातील प्रतिनिधींना घेऊन विशेष बस वाहनातून अमृत कलश यात्रेच्या प्रवासाचा प्रारंभ झाला. ही यात्रा पिंपरी चिंचवड शहरात आल्यानंतर मोठ्या उत्साहात तिचे स्वागत करण्यात आले.

# शहरातील राजकीय नेत्यांच्या सभा उधळणार!

## मराठा क्रांती मोर्चाचा इशारा



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा समाजास आरक्षण दिल्याशिवाय मंत्री आमदार, खासदार यांनी पिंपरी चिंचवड शहरात कार्यक्रम घेण्याचे धाडस करू नये. अन्यथा त्यांच्या सभा उधळणार असा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने साखळी उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी देण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पिंपरी चिंचवड शहरात मराठा बांधवांचे साखळी उपोषण सुरू आहे. या उपोषणाचा आज दुसरा दिवस होता. उपोषण स्थळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मराठा बंधू भगिनींनी व इतर समाजाच्या संस्था संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. आज सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांची उपोषण स्थळी बैठक झाली. यावेळी मराठा समाजास कायमस्वरूपी टिकाऊ आरक्षण दिल्याशिवाय कोणत्याही आमदार, खासदार व मंत्र्यांनी शहरात जाहीर कार्यक्रम घेऊ नये अन्यथा सदर कार्यक्रम मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने संविधानिक मार्गाने उधळण्यात येईल येईल असा इशारा उपस्थितीतांनी दिला. यावेळी उपोषण स्थळी कामगार नेते कैलास कदम, कामगार नेते काशिनाथ नखाते, हरीष मोरे, मारुती भापकर, सुभाष साळुंखे, अरूण पवार, गौतम चाबुकस्वार, मनोज गरबडे, राजाभाऊ गोलांडे, विलास भालेकर, कल्पना गिड्डे, विष्णुपंत तांदळे, राजेंद्र कुंजीर, उदयसिंह पाटील आदी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी अनेक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीस उपस्थित राहून पाठिंबा दिला. सरकार मराठा समाजाच्या मागणीबाबत टाळाटाळ करत आहे. सदर आंदोलन उधळून लावण्याचा प्रयत्न करत आहे. आंदोलनात फूट पाडण्याचा सरकारचा इरादा आहे. अशा तीव्र स्वरूपाच्या भावना उपस्थितांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या. आज सतीश काळे, मीराताई कदम, वैभव जाधव, प्रकाश जाधव, मोनल शिंत्रे, संजिवनी पुराणिक, नकुल भोईर, सतिश चांधेरे, अभिषेक म्हसे, काशिनाथ जगताप, संदीप नवसुपे, रावसाहेब गंगाधरे, संतोष शिंदे, सचिन पवार, निलेश बदाले, सिद्धार्थ शिरसाट, गणेश आहेर, मोहन जगताप, पांडुरंग प्रचंडराव आदी कार्यकर्त्यांनी साखळी उपोषण केले.

# शहर पोलीस दलातील पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या!

## पिंपरी चिंचवडमधील पाच पोलीस निरीक्षकांचा समावेश



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलातील पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या झाल्या. गृह विभागाने नुकतीच १०४ पोलीस निरीक्षकांना पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त पदावर बढती दिली. त्यामध्ये पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलातील पाच पोलीस निरीक्षकांचा समावेश होता. बढती वर बदलून गेलेल्या अधिकाऱ्यांच्या जागी नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर, निगडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगनाथ उंडे, दरोडा विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक दीपक शिंदे, तळेगाव दाभाडेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यवान माने, भोसरीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव या अधिकाऱ्यांना बढती मिळाली आहे. यातील विवेक मुगळीकर यांची पिंपरी चिंचवड शहरात सहायक आयुक्त पदावर पदस्थापना करण्यात आली आहे. शंकर अवताडे (गुन्हे शाखा युनिट चार ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक तळेगाव दाभाडे)श्रीराम पौळ (शिरगाव परंदवडी ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी) कृष्णदेव खराडे (चिंचवड ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरगाव परंदवडी) दिलीप शिंदे (वाहतूक शाखा ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिंचवड) अमरनाथ वाघमोडेशिवाजी गवारेरणजीत सावंत

संजय तुंगार (सायबर सेल ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक तळेगाव एमआयडीसी)

# पिंपरी-चिंचवडकरांची पसंती दुचाकीला!

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर पिंपरी-चिंचवडवासीयांनी दुचाकीखरेदीला पसंती दिली. चार हजार ७२ दुचाकी आणि दोन हजार ४५१ मोटार खरेदी केल्या आहेत. पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात १५ ते २४ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत सात हजार २७६ वाहनांची नोंदणी झाली. त्यातून ३७ कोटी ४५ लाख ५९ हजार रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. मुहूर्तावर वाहन नेण्यासाठी अनेकांची पसंती असते. त्यामुळे काही दिवस आधीच वाहनांची नोंदणी केली जाते. त्यानुसार घटस्थापनेपासून दहा दिवसांत सात हजार २७६ वाहनांची नोंदणी झाली. आकडेवारीनुसार दुचाकी वाहनांची संख्या सर्वात जास्त म्हणजेच चार हजार ७२ तर, मोटारींची संख्या दोन हजार ४५१ इतकी आहे. त्याशिवाय ४८ ट्रॅक्टर, २६६ माल वाहतूक टेम्पो, ११८ तीनचाकी, ३६ खासगी बस, २८५ इतर वाहनांची नोंदणी झाली. दहा दिवसांमध्ये सात हजार २७६ वाहनांची नोंदणी झाली. त्यापोटी ३७ कोटी ४५ लाख रुपयांचा महसूल कार्यालयाला प्राप्त झाल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी सांगितले.

# भूसंपादन रखडण्याचा पालिकेला फटका!

## भूसंपादन रखडल्यामुळे भूसंपादनाच्या खर्चात वाढ




**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या तीव्र झाली असतानाच येरवडा परिसरातील सात किलोमीटर लांबीच्या रस्ता रुंदीकरणासाठी तब्बल ९१६ कोटी रुपये भूसंपादनासाठी खर्च करावे लागणार आहेत. पंधरा जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेला हा खर्च करावा लागणार असून, भूसंपादन रखडल्यामुळे भूसंपादनाच्या खर्चात २९४ कोटींनी वाढ झाली आहे. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यादृष्टीने महापालिकेने नगर रस्ता परिसराचा एकात्मिक वाहतूक आराखडाही तयार केला असून, समतल विलगक, उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. याशिवाय सेवा रस्ते आणि रस्ता रुंदीकरणाची कामेही प्रस्तावित आहेत. येरवडा ते आपले घर या सात किलोमीटर अंतराचे रस्ता रुंदीकरणही प्रस्तावित आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यात हा रस्ता दोन्ही बाजूने ६० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आला आहे. मात्र रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन रखडल्याने महा पालिकेवर आर्थिक भुर्दंड पडत असल्याची कबुली महापालिकेकडूनच माहिती अधिकारात देण्यात आली आहे. विकास आराखड्यातील रस्त्या साठीचे भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. येरवडा, वडगाव शेरी, लोहगाव या भागात महापालिकेच्या हद्दीत भूसंपादनाची कार्यवाही विशेष अधिकारी यांच्यामार्फत सुरू आहे. प्रारूप निवाडा मंजुरीनंतर ८०२ कोटी ७ लाख ४ हजार ८८८ रुपये रक्कम भरणे प्रलंबित आहे. तसेच वडगाव शेरी, लोहगाव, खराडी, नगर रस्ता सीटीआर कंपनी ते महापालिकेच्या नवीन हद्दीत ६० मीटर रस्ता रुंदीकरणासाठी ११४ कोटी ५६ लाख ८२ हजार ६५५ रुपये रक्कम निवाडा रक्कम भरणे प्रलंबित आहे. रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने खर्चातही वाढ झाल्याची वस्तुस्थिती असून रुंदीकरणाअभावी नगर रस्त्यावरील चौकात वाहतूक कोंडी होत आहे. तसेच सेवा रस्तेही कागदावरच राहिले असून, विमाननगर चौक, इन ऑर्बिट मॉल चौक आणि शास्त्रीनगर येथे वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. दरम्यान, भूसंपादनाची मूळ रक्कम कमी आहे. मात्र प्रतिवर्षी त्या रकमेवर १२ टक्के व्याज द्यावे लागत आहे. त्यामुळे रक्कम वाढली आहे. जसा निधी मंजूर होत आहे त्या पद्धतीने काम सुरू आहे. भूसंपादनाची मूळ रक्कम कमी आहे. परंतु दरवर्षी त्या रकमेवर १२ टक्के व्याज लागते, त्यामुळे ती वाढली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. जसा निधी उपलब्ध होईल, तसे काम सुरू आहे, असा दावा महापालिकेच्या भूसंपादन आणि व्यवस्था पन विभागाकडून करण्यात आला आहे.

### पालिकेवर आर्थिक भुर्दंड

» नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यादृष्टीने महापालिकेने नगर रस्ता परिसराचा एकात्मिक वाहतूक आराखडाही तयार केला असून, समतल विलगक, उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. याशिवाय सेवा रस्ते आणि रस्ता रुंदीकरणाची कामेही प्रस्तावित आहेत. येरवडा ते आपले घर या सात किलोमीटर अंतराचे रस्ता रुंदीकरणही प्रस्तावित आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यात हा रस्ता दोन्ही बाजूने ६० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आला आहे. मात्र रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन रखडल्याने महापालिकेवर आर्थिक भुर्दंड पडत असल्याची कबुली महापालिकेकडूनच माहिती अधिकारात देण्यात आली आहे.

# चाकणमधील वाहतूक कोंडी सुटणार!

## सात दिवसांत अतिक्रमणे काढण्याचा निर्णय



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** चाकणमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या जाणार आहेत. तळेगाव, आंबेठाण चौकातील महाराष्ट्र शासनाच्या एसटी बसचे थांबे शंभर मीटर पुढे नेले जाणार आहेत. मजूर अड्डा दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात येणार आहे. येत्या सात दिवसांत अतिक्रमणे काढून टाकण्याचा निर्णय विभागीय आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीत झाला. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता आहे.

औद्योगिक संघटनांच्या पुढाकाराने विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी वाहतूक समस्या सोडविण्यासाठी बैठक घेतली. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष दीपक करंदीकर, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीचे सचिव दिलीप बटवाल यावेळी उपस्थित होते. चाकण परिसर हा अत्यंत वेगाने विकसित होणारा औद्योगिक परिसर आहे. रहिवाशी भागही वाढत आहे. कामगार वर्ग, उद्योजक, साहित्याची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असलेले अत्यंत वर्दळीचे ठिकाण आहे. चाकणमधील तळेगाव चौक, आंबेठाण चौकातील वाहतूक कोंडी मोठी समस्या बनलेली आहे. वाहनाच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील कामगार वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहोचू शकत नाहीत. याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी उद्योजकांनी केली होती. त्यानुसार विभागीय आयुक्तांनी बैठक घेत संबंधितांना विविध सूचना दिल्या आहेत.

### वाहनाच्या लांबच लांब रांगा

» कामगार वर्ग, उद्योजक, साहित्याची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असलेले अत्यंत वर्दळीचे ठिकाण आहे. चाकणमधील तळेगाव चौक, आंबेठाण चौकातील वाहतूक कोंडी मोठी समस्या बनलेली आहे. वाहनाच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील कामगार वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहोचू शकत नाहीत. याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.

# नीरा ते लोणंद आता रेल्वे सुसाट!

## रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम पूर्ण

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. त्यातील नीरा ते लोणंद स्थानकांच्या दरम्यान दुहेरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गावर रेल्वे गाडीची प्रति तास ११७ किलोमीटर वेगाची चाचणी यशस्वीपणे घेण्यात आली. त्यामुळे या मार्गावर आता गाड्यांचा वेग वाढणार आहे. रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांनी नीरा ते लोणंद या स्थानकांदरम्यानच्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाची पाहणी केली. हा मार्ग ७.६४ किलोमीटर लांबीचा आहे. या पाहणीनंतर त्यांनी या मार्गावर गाड्या चालविण्यास संमती दिली. त्यामुळे नीरा-लोणंद या दरम्यान आता दोन्ही मार्गांवरून रेल्वे वाहतूक होईल. त्यातून गाड्या सुरळीत आणि वेगाने धावण्यास मदत होईल. या वेळी अरोरा यांच्यासोबत निर्माण विभागाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी विवेक कुमार गुप्ता, विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदु दुबे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



### पुणे-मिरज रेल्वे मार्ग दुहेरीकरण

- » एकूण लांबी – २७९.०५ किमी
- » दुहेरीकरण पूर्ण – १७४.८५ किमी
- » प्रकल्प खर्च – ४,८८२.५३ कोटी रुपये
- » आतापर्यंतचा खर्च – ३,२०० कोटी रुपये
- » पूर्ण झालेले काम – ८६ टक्के

पुणे – मिरज हा रेल्वे मार्ग २७९.०५ किलोमीटर लांबीचा आहे. या रेल्वे मार्गावर आतापर्यंत १७४.६८ किलोमीटर दुहेरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्यात पुणे ते शिंदवणे, आंबळे ते राजेवाडी, दौंडज ते वाल्हा, शेणोली ते भवानीनगर, भवानीनगर ते ताकारी, ताकारी ते किर्लोस्करवाडी, सातारा ते कोरेगाव, पळशी ते जरंडेश्वर, नांद्रे ते भिलवडी, नांद्रे ते सांगली यांचा समावेश आहे. इतर भागातही दुहेरीकरणाचे कार्य वेगाने सुरू आहे.

# शाळेत सौर ऊर्जेवरील विद्युत निर्मिती!

## दररोज दोनशे युनिट वीजनिर्मिती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत सौरऊर्जेवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्प साकारण्यात आला आहे. ५१ किलो वॅट क्षमतेचा, दोनशे युनिट प्रतिदिन वीज निर्मिती करणाऱ्या या प्रकल्पात १५१ सोलर पॅनेल असून, या प्रकल्पाच्या सौरविद्युत कार्यक्षेत्रात शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व वर्ग, आवार, मैदान असा सर्व परिसर समाविष्ट आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे यांच्या हस्ते या पथदर्शी प्रकल्पाचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. उपाध्यक्ष डॉ. रवींद्र आचार्य, कार्यवाह धनंजय कुलकर्णी, शाळेचे वित्त नियंत्रक डॉ. आशिष पुराणिक, प्रबंधक डॉ. सविता केळकर, सदस्य डॉ. शरद आगरखेडकर, शालासमिती अध्यक्ष अ‍ॅड. अशोक पलांडे या वेळी उपस्थित होते. शाळेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रमणबाग प्रशालेचे माजी मुख्याध्यापक सुनील शिवले, रमणबाग शाळेचे परदेशस्थ माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी पालक, शिक्षक, संस्था यांच्यातर्फे या प्रकल्पाची उभारून कार्यान्वित करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून सौरऊर्जा विद्युत निर्मिती प्रकल्प उभारणारी रमणबाग शाळा राज्यातील पहिली अनुदानित मराठी माध्यमाची शाळा असल्याचे डॉ. कुंटे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक आणि भौतिक सुविधांची उभारणी काळाच्या पुढचा विचार करून उभारले जात असल्याचे शालाप्रमुख मनीषा मिनोचा यांनी सांगितले.



### प्रकल्पात १५१ सोलर पॅनेल

» न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत सौरऊर्जेवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्प साकारण्यात आला आहे. ५१ किलो वॅट क्षमतेचा, दोनशे युनिट प्रतिदिन वीज निर्मिती करणाऱ्या या प्रकल्पात १५१ सोलर पॅनेल असून, या प्रकल्पाच्या सौरविद्युत कार्यक्षेत्रात शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व वर्ग, आवार, मैदान असा सर्व परिसर समाविष्ट आहे.

# अडीच वर्षात ४२ हजार जणांना कुत्र्याचा चावा!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरामध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत वाढत आहे. त्याचा फटका महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह दुचाकीस्वारांना बसत आहे. गेल्या अडीच वर्षात तब्बल ४२ हजार ६६५ हजार जणांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. यामध्ये एकाही नागरिकाचा रेबीज होऊन मृत्यू झालेला नाही, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे. शहरातील भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात आज महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी आढावा बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे, आरोग्य प्रमुख डॉ. भगवान पवार, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यावेळी उपस्थित होत्या.

महापालिकेने २०१८ मध्ये भटक्या कुत्र्यांची गणना केली. त्यामध्ये ३ लाख १५ हजार कुत्र्यांची नोंद झाली होती., तर २०२३ मध्ये केलेल्या गणनेत ही संख्या कमी होऊन १ लाख ७९ हजार ९४० इतकी झाली आहे. महापालिकेने नसबंदी कार्यक्रम व्यवस्थित राबविल्याने कुत्र्यांची वाढ रोखण्यात यश आले आहे असे या अहवालात नमूद केले आहे. मात्र, शहरातील भटक्या कुत्र्यांचा त्रास कमी झालेला नाही. दिवसा आणि रात्रीच्या वेळी कुत्र्यांचा हल्ला होत असल्याने अनेक जण जखमी झाले आहेत. २०२१ पासून या घटनांमध्ये वाद झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. दरम्यान, महापालिका आयुक्तांनी शहरातील भटक्या कुत्र्यांचा आढावा घेत नसबंदी करण्याचे काम आणखी वेगात होणे आवश्यक आहे. त्यासाठी आणखी दोन संस्थांची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची सूचना आजच्या बैठकीमध्ये केली आहे.